# द्वितीय राज्य स्तरीय वास्तुकला मराठी परिषद, २०२३

२७ फेब्रुवारी २०२३

# शोधनिबंध पुस्तिका

ISBN: 978-93-5780-547-6

भाषा जनाची भाषा मनाची

आयोजक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

भारतीय कला प्रसारिणी सभेचे वास्तुविद्या महाविद्यालय, पुणे

ATTESTED
PRINCIPAL
Maratha Vidya Prasarak Samaj's
COLLEGE OF ARCHITECTURE

 ISBN: 978-93-5780-547-6

# डोंगराळ वसाहती आणि शाश्वत विकास

*श्री. गौरव दिलीप अरबुज*
*सहायक प्राध्यापक*
*मराठा विद्या प्रसारक समाजाचे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, नाशिक.*
gauravarbooj@cansnashik.org

**गोषवारा :**

डोंगराळ प्रदेश हे मानवी हस्तक्षेपासाठी अतिशय संवेदनशील समजले जातात. म्हणूनच आशा भागातील विकास प्रकल्प हे निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करून मगच पुढे गेले पाहिजे. वाढते पर्यटन व त्याला धरून येणारी अर्थव्यवस्था निसर्गाचे संसाधन नष्ट करणारी ठरू नये. पर्यावरण पूरक अशी विकासाची दिशा शोधण्यासाठी जमिनीचा विविध पैलूंचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. उतार , पाण्याच प्रवाह व इतर अनेक बाबी तपासून त्याला अनुरूप विकास हा परस्पर पूरक ठरू शकतो. शोधनिबंध अशाच एक उदाहरणाचा अभ्यास करून तथ्य तपासून बघण्याचा प्रयत्न आहे.

**परिचय :**

डोंगराळ भाग हे नैसर्गिक विविधतेचे घर मानले जाते. लुप्त प्राय प्रजातीचे निवास स्थान आणि परिसंस्थेचा महत्वाचा भाग आहे. असे डोंगराळ भाग जेव्हा अनियमित व अनियंत्रित विकासाला समोर जातात तेव्हा त्यांचा नैसर्गिक संसाधनांवर परिणाम होणार हे नक्की.

पर्यटन हे आज अनेक डोंगराळ प्रदेशांसाठी आर्थिक उलाढालीचे आणि रोजगाराचे महत्त्वाचे साधन आहे. वाढत्या पर्यटन उद्योगा सोबत नैसर्गिक संसाधन व मानववंशीय हस्तक्षेप याचा पूरक विचार होणे अतिशय गरजेचे आहे.

प्रसन्न आणि निसर्गरम्य नैसर्गिक वातावरण व नैसर्गिक संसाधनांची उपलब्धता याचे डोंगराळ प्रदेशाला महान मूल्य आहे, यावरच पर्यटन तेथे टिकून राहते व वाढते. अतिरिक्त विकास मात्र याचा नैसर्गिक सांसाधनाचा ऱ्हास होण्यास कारणीभूत ठरू शकतो व परिणामी त्यावर अवलंबून असणारा रोजगार देखील कमी होऊ शकतो. म्हणूनच बेलगाम विकास डोंगराळ प्रदेशातील संवेदनशील भागात अपरिवर्तनीय नुकसान घडवून आणू नये म्हणून त्याकडे विशेष लक्ष देणे महत्वाचे आहे.

भारतीय डोंगरी शहरे ही उदाहरणे आहेत जिथे नैसर्गिक व पर्यावरणीय संवेदनशील भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर शहरी विकास कामे झाली आहेत व होत आहेत. या परिस्थितीमध्ये एकात्मिक विकास हा अधिक चांगल्या पर्यावरणीय परिस्थिती आणि सुधारित मानववंशीय हस्तक्षेप यासाठी उत्तम दृष्टीकोन आहे .

**पार्श्वभूमी :**



ATTESTED
PRINCIPAL
Maratha Vidya Prasarak Samaj's
COLLEGE OF ARCHITECTURE
Nashik

 ISBN: 978-93-5780-547-6

**संदर्भ :**

१. Mcharg, I. (1995). Design with nature. New York: John Wiley & Sons.

२. Belsky, A. J., & Brown, R. .. (1995). Key Elements for Ecological Planning: Management Principles, Recommendations, and Guidelines for Federal Lands East of the Cascade Crest in Oregon and Washington. Columbia River Bioregion Columbia River Bioregion.

३. Bhatia, B. (1992, December 19-26). Lush Fields and Parched Throats Political Economy of Groundwater in Gujarat. *Economic and Political Weekly*, pp. 142-170.

४. Kawakami, M., Shen, Z. -j., Pai, J. -t., Gao, X. -S., & Zhang, M. (Eds.). (2013). *Spatial Planning and Sustainable Development: Approaches for Achieving Sustainable Urban Form in Asian Cities.* Springer Netherlands.

५. Ministry of Environment & Forests, Government of India. (2009). Serial Nomination of The Western Ghats of India: Its Natural Heritage For inscription on the World Natural Heritage List by UNESCO.

६. Steiner, F. (2000). The Living Landscape, an ecological approach to landscape planning. Mcgraw-Hill.



ATTESTED
PRINCIPAL
Maratha Vidya Prasarak Samaj's
COLLEGE OF ARCHITECTURE
Nashik

 ISBN: 978-93-5780-547-6

# कलाकार बस्ती - दिल्ली

*श्री. गौरव दिलीप अरबुज*
*सहायक प्राध्यापक*
*मराठा विद्या प्रसारक समाजाचे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, नाशिक.*
gauravarbooj@cansnashik.org

**गोषवारा :**
भारत हा विविध कला आणि संस्कृतींनी समृद्ध असा देश आहे. प्रत्येक गाव आपली एक विशिष्ट कला, संस्कृति आणि परंपरा जतन करतो. त्या प्रत्येक परंपरेला आपला एक इतिहास आहे. अनेक कलाकार आपली संस्कृति आणि कला घेऊन विविध ठिकाणी स्थलांतर झाले. याच प्रवासात कठपुतली कॉलनी या अद्वितीय अशा समुदायाचा उगम झाला. आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवलेले हे कलाकार आणि त्यांची वर्तमानाची परिस्थिती याचा आढावा या शोध निबंधात घेण्यात आला आहे.

**परिचय :**
समकालीन कालावधी मध्ये भारत अतिशय वेगवान आशा अर्थव्यवस्थेचा भाग आहे. शहरांवर जागा आणि पायाभूत सुविधा यांचा दबाव वाढतच चालला आहे. वाढती लोकसंख्या, बदलती हवामान परिस्थिती आणि नैसर्गिक संसाधनांवर होणार नकारात्मक परिणाम अनेक प्रश्न निर्माण करीत आहेत. ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतर होणारी गर्दी शहरांच्या पायाभूत सुविधांवर दबाव वाढवते आहे.

**पार्श्वभूमी :**
शहरांची ओळख म्हणजे तिथे राहणारी माणसं. शहरांच्या या दाट फॅब्रिक मध्ये अशी अनेक ठिकाण आणि जागा आहेत जे त्यांचे अद्वितीय अस्तित्व टिकवून ठेवत आहेत. आशा जागा जय कित्येक वर्षांच्या उत्क्रांती मधून विकसित झाल्या आहेत आणि आजही आपले महत्व प्रस्थापित करत आहेत.

अशीच एक जागा आहे दिल्ली मध्ये, अशी वसाहत जिथे अद्वितीय पारंपरिक कलाकार एकत्र राहतात. पारंपरिक भारतीय कलाकार...

**वसाहत :**
दिल्ली शहराच्या मध्यवर्ती शदिपुर डेपो येथे अनौपचारिक पारंपरिक कलाकारांची विशिष्ट अशी वसाहत आहे. कलाकार बस्ती अथवा कठपुतली कॉलनी म्हणून देखील ती ओळखली जाते. या वसाहतीमधे अद्वितीय असे कला आणि कलाकारांचे संयोजन बघायला मिळते.
कटपुटली वाले, राजस्थानी लोक गीत व संगीत सदर करणारे भोपा, डोंबारी (दोरीवरुन चालण्यासारखी, खास करून सर्कशीतील अवघड आणि शारीरिक चपळाईची कामे करणारा माणूस), हात चलाखीचे प्रयोग करणारा जादूगार, प्राण्यांचे खेळ दाखवणार कलाकार, पारंपरिक चित्रकार, भैरुपी, लोकनृत्य व लोकसंगीत दाखवणारे कलाकार आणि असे अनेक लोप पावत चाललेल्या कलांचे उत्तम जाणकार या वसाहती मध्ये



ATTESTED
PRINCIPAL
Maratha Vidya Prasarak Samaj's
COLLEGE OF ARCHITECTURE
Nashik

 ISBN: 978-93-5780-547-6

**संदर्भ :**

१. Field study documentation conducted by author himself.
२. https://www.jagran.com/delhi/new-delhi-city-ncr-700-flats-will-be-allotted-soon-in-delhi-kathputli-colony-by-delhi-development-authority-22983080.html
३. saarthi NGO, delhi
४. https://parcitypatory.org/2016/06/26/kathputli/
५. https://time.com/12073/india-kathputli-colony-of-street-artists-to-be-demolished/
६. https://www.mansworldindia.com/more/news/kathputli-colony-traditional-folk-artists/
७. https://www.atlasofhumanity.com/kathputli



ATTESTED
PRINCIPAL
Maratha Vidya Prasarak Samaj's
COLLEGE OF ARCHITECTURE
Nashik